ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष १० पुणें, बुधवार तारीख ३ फेब्रुवारी, १९५४ अंक ५

## विविध माहिती

**कच्छमधील कॉलेजची इमारत**—श्री. आर. आर. लालन नांवाच्या एका कच्छी धनपतीनें रामजी रावजी लालन कॉलेजची इमारत बांधण्यासाठी २,२८,००० रुपयांची देणगी दिली आहे. कच्छमधील हें पहिलेंच कॉलेज असून तें गेल्या जूनपासून चालू करण्यांत आलें. आतांपर्यंत महाराव मदनसिंहजी ह्यांनीं वापरण्यास दिलेल्या एका राजवाड्यांत कॉलेज भरत असे.

**हैद्राबाद राज्याचें सोन्याचें उत्पादन**—१९५३ च्या डिसेंबर महिन्यांत हैद्राबाद राज्यांतील सोन्याच्या खाणीमधून ८७९·२३ औंस सोन्याचें उत्पादन झालें. राज्यामधील कोळशाच्या खाणींचें उत्पादन १,३०,४५९ टन इतकें झालें.

**फळें टिकविण्याचें शिक्षण**—मध्यप्रदेश सरकारच्या उद्योग-खात्यानें फळें टिकविण्याचें शिक्षण देणारा वर्ग काढला आहे. सध्यां २२ जण हें शिक्षण घेत असून त्यांना लिंबाचा रस, नारिंगाचा रस, पेरूचा मोरंबा, टॉफी, इत्यादि टिकाऊ पदार्थ तयार करण्याचें शिक्षण देण्यांत येत आहे. गव्हाचे पोहे करण्याचें जें यंत्र खात्यानें तयार केलें होतें तें आतां यंत्रचलित करण्यांत आलें आहे.

**जपान-रशिया व्यापार**—जपान आणि रशिआ ह्यांच्यांत राजनैतिक संबंध नसल्यामुळें कांहीं जपानी व्यापारी रशिआशीं सांस्कृतिक संबंध जोडण्याचा प्रयत्न करीत आहेत. जपानी व्यापारी रशिआंत जपानी चित्रपट पाठवून, रशिआंतून ग्रामोफोनचे रेकॉर्डस मिळविण्याच्या खटपटींत आहेत. रशिअन संगिताच्या १,००,००० ध्वनिमुद्रिका घेऊन त्यांच्या मोबदल्यांत कृत्रिम रेशीम देण्याचा करार एक जपानी कंपनी करणार आहे.

**हैद्राबादच्या गिरणीला कर्ज**—हैद्राबाद स्पिनिंग अँड विव्हिंग मिलसच्या चालकांनीं कांहीं कामगारांना तात्पुरते नोकरीवरून कमी केलें आहे. चालकांनीं ह्या बाबतींत कामगारांशीं तडजोड घडवून आणल्यास १० लाख रुपयांचें कर्ज देण्याची तयारी राज्यसरकारनें दाखविली आहे, असें समजतें.

**भारतीय रेल्वेच्या मालकीचे छापखाने**—भारतीय रेल्वेच्या मालकीचे १५ छापखाने आहेत. एकाच मालकाच्या मालकीचे अनेक छापखाने असणाऱ्यांत रेल्वेचा नंबर बराच वरचा लागतो.

**भारतीय हत्तींना मागणी**—जर्मनीमधील एका प्राणिसंग्रहालयानें दोन भारतीय हत्ती खरेदी केले आहेत. हत्तींचें वय दोन व तीन वर्षांचें असून त्यांना घेऊन जाणारी बोट हॉलंडच्या मालकीची आहे. हत्तींची प्रवासांत नीट सोय लावण्यासाठी दोन खास खलाशी त्यांच्याबरोबर जाणार आहेत. हत्ती हँबुर्ग येथें उतरविण्यांत येतील.

**प्राणिसंग्रहालयांतील रहिवाशांची शिरगणती**—लंडनमधील प्राणिसंग्रहालयांतील रहिवाशांची शिरगणती नुकतीच करण्यांत आली. संग्रहालयांत निरनिराळ्या जातींचे ३,२६३ प्राणी असून त्यांची किंमत सुमारें ७६,००० पौंड आहे. पाण्यांत रहाणाऱ्या प्राण्यांची मोजदाद वेगळी करण्यांत आली. त्यांची संख्या ३,००० असून किंमत २,०८० पौंड आहे. सगळ्यांत अधिक किंमतीचे प्राणी म्हणजे एक गोरिला वानर, एक काळा गेंडा आणि दोन पाणघोडे आहेत. त्यांची किंमत प्रत्येकी १,५०० पौंड आहे.

**बेकारांसाठी कामधंदा**—म्हैसूर राज्यांतील बेकारीला आळा घालण्यासाठी राज्य-सरकारनें १० योजना भारतीय नियोजन मंडळाला सादर केल्या आहेत. त्या सर्वांना मिळून ५ कोटी रुपये खर्च येईल. राज्य-विधिमंडळांत मुद्दाम प्रश्न विचारण्यांत आल्यावर त्याला उत्तर म्हणून मुख्य मंत्र्यांनीं वरील माहिती सादर केली.

**रॉकफेलर फौंडेशनची मदत**—भारतामधील लोकसंख्येचा दहा वर्षें सूक्ष्म अभ्यास करण्यासाठीं अमेरिकेंतील रॉकफेलर फौंडेशननें ६८,४५० डॉलर्सची रक्कम देऊं केली आहे. हा अभ्यास भारतीय सरकार, लुधिआना येथील मेडिकल कॉलेज आणि हार्वर्ड विद्यापीठ, ह्यांनीं संयुक्तपणें करावयाचा आहे.

**मुलांसाठी इस्पितळ**—काश्मीर सरकार मुलांच्यासाठी एक खास इस्पितळ उघडणार आहे, असें समजतें. इस्पितळामधील साधन-साहित्य जागतिक आरोग्य संघटना आणि संयुक्त राष्ट्र-संघटनेची शास्त्रीय आणि सांस्कृतिक शाखा ह्यांच्यातर्फें पुरविण्यांत येणार आहे, असें समजतें.

**दिल्लीमधील प्रजासत्ताक दिन**—मध्यवर्ती सरकारच्या दिल्लीमधील कचेऱ्यांवर प्रजासत्ताक दिनानिमित्त अपूर्व रोषणाई करण्यांत आली होती. रोषणाई २५, २६ व २७ जानेवारी ह्या तिन्हीं दिवशीं चालू ठेवण्यांत आली होती. सर्व इमारतींवर मिळून १०,००० विजेचे दिवे लखलखत होते.

**विड्या करण्याच्या यंत्राला विरोध**—रूरल पीपलस ऑर्गनायझेशन ह्या संघटनेचे अध्यक्ष श्री. एन्. जी. रंगा ह्यांनीं विड्या तयार करणारीं यंत्रें वापरण्याविषयीं निषेध प्रदर्शित केला आहे. ह्या यंत्रांचा वापर करण्यांत आल्यास १,००,००० कामगार बेकार होतील आणि बेकारीस आळा घालण्याचे सरकारी प्रयत्न विफल होतील; म्हणून भारतीय सरकारच्या व्यापार आणि उद्योग-खात्यानें त्यांच्या वापरास बंदी करावी, असें त्यांचें म्हणणें आहे.

**ॲटलस सायकल इंडस्ट्रीज**—सोनपत येथील सायकलींच्या ह्या कारखान्यांत दर महिना ५,००० सायकली तयार होऊं लागल्या आहेत. १९५४ सालीं १ लाख सायकली कारखान्यांत तयार होतील असा अंदाज आहे. भारतांत दर महिना सुमारें ३१,००० सायकली खपतात. पण भारतीय कारखान्यांत फक्त २७,००० सायकलीच तयार होऊं शकतात. सायकलींच्या धंद्याला संरक्षण देण्यांत आलें असून भारताच्या पंचवार्षिक योजनेंत त्याचा समावेश करण्यांत आला आहे.

**भारतीय तंबाखूला गिऱ्हाईक**—प. जर्मनीमधील व्यापारी भारताकडून मोठ्या प्रमाणावर तंबाखू घेण्याचा विचार करीत आहेत, असें समजतें. भारतानें क्रप्स-डिमॅग ह्या पोलादाच्या कारखान्याशीं औद्योगिक करार केल्यापासून बरेच जर्मन कारखानदार आपल्या तांत्रिक ज्ञानाचा फायदा भारताला करून देण्यास उत्सुक आहेत. कांहीं प्रमाणांत ते भांडवलहि घालण्यास तयार आहेत, असें कळतें.

**रशिआ ब्रिटिश माल विकत घेणार !**—कापडाच्या गिरण्यांची यंत्रसामुग्री बनविणाऱ्या १२ कारखान्यांचे प्रतिनिधी नुकतेंच मॉस्कोला गेले होते. कांहीं दिवसांपूर्वी रशिअन तज्ज्ञांनीं लँकेशायर आणि यॉर्कशायरमधील कापडाच्या गिरण्यांना भेटी दिल्या होत्या. त्यानंतर रशिआच्या परदेशीय व्यापाराच्या खात्यातर्फे वरील कारखानदारांना मुद्दाम आमंत्रण धाडण्यांत आलें. रशिआ ब्रिटनकडून कापडाच्या गिरण्यांची यंत्रसामुग्री मोठ्या प्रमाणावर विकत घेईल, असा अंदाज करण्यांत येत आहे.

**अणुहल्यापासून संरक्षण**—लंडनवर अणुबॉंबचा हल्ला झाला तर नागरिकांच्या संरक्षणयोजनेचीं सूत्रें हलविण्यासाठीं एक भूमिगत कचेरी बांधण्यांत आली आहे. लंडनच्या आग्नेय भागांत हा भूमिगत किल्ला बांधण्यांत आला असून त्यांत जाण्याचा मार्ग गोलाकार जिन्यासारखा बांधण्यांत आला आहे. किल्ल्याचीं दारें पोलादाचीं आणि कॉंक्रीटचीं आहेत.


॥ श्री ॥

# दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें २.

— उत्पादन-मित्रानें —

**ठेवींचा ४६ वा व ४७ वा लक्ष व्याजासह परत केला आहे**

## दहा टक्के नफ्याची शाश्वति

कामत कमिटीच्या रिपोर्टप्रमाणें मुंबई सरकारकडून साखर-कारखान्यांना "फॅक्टरी एरिया" व ऊंसाच्या पिकाला कॅनालच्या पाण्याची हमी १९३२ सालापासून मिळाली. सरकारच्या ह्या सवलतीमुळें महाराष्ट्रांतील कॅनाल इरिगेशनवर ऊंस करणाऱ्या साखर-कारखान्यांना दहा टक्के नफ्याची शाश्वति असते.

सिंडिकेटला "फॅक्टरी एरिया" व १९४५ सालापासून २००० एकर उसाच्या पिकाला कॅनालच्या पाण्याची हमी आहे.

जुन्या तीनशें टनांच्या मशिनरीनें साखर करण्याचा हंगाम सप्टेंबरपर्यंत लांबवावा लागे व खर्च जास्त येऊन शंभर टन उसाचीं (७०) सत्तर पोतीं साखर असें उत्पादन घेणें भाग पडे.

**नवीन हजार टनांच्या मशिनरीनें साखर करण्याचा हंगाम एप्रिल अखेर संपवून चालू हंगामांत शंभर टन उसाचीं (११०) एकशेदहा पोतीं साखर असें उत्पादन मिळवितां येतें.**

**—साखर-विक्रीवर सरकारी नियंत्रण असेपर्यंत—**
**बँकेचे कॅशक्रेडिट किंवा नवीन ठेवी घ्याव्या लागतील**

## ठेवींच्या व्याजाचे दर

★ मुदत तीन वर्षें — व्याज ७ (सात) टक्के.
★ मुदत एक वर्ष — व्याज ६ (सहा) टक्के.

ठेवींचे फॉर्म सिंडिकेटच्या पुणें येथील मुख्य कचेरींत मिळतील.

९८० सदाशिव पेठ, लक्ष्मीपथ पुणें २.
दि. २७-१-१९५४

चंद्रशेखर गोविंद आगाशे,
मॅनेजिंग एजंट्स.

# अर्थ

बुधवार, ता. ३ फेब्रुवारी, १९५४





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## सिड्ने परिषदेनें घेतलेले महत्त्वाचे निर्णय

सिड्ने येथें ब्रिटिश राष्ट्रकुटुंबांतील अर्थमंत्र्यांची परिषद जानेवारी महिन्याच्या ८ ते १५ तारखांपर्यंत भरली होती. हिंदचे अर्थमंत्री श्री. देशमुख या परिषदेला हजर होते. परिषदेहून परत आल्यावर ता. २१ रोजीं मद्रास येथें ते म्हणाले कीं, मंदीबद्दल भीति बाळगण्याचें कांहीं कारण नाहीं व प्रत्येक देशानें आपल्या विकास-योजनांचा कार्यक्रम चालू ठेवला पाहिजे. आर्थिक परिस्थितीबद्दल परिषदेंत कांहीं उपयुक्त निर्णय घेण्यांत आले आहेत, असेंहि श्री. देशमुख म्हणाले. सिडने परिषदेच्या कार्याबद्दल ब्रिटनचे अर्थमंत्री मि. बटलर व ऑस्ट्रेलियाचे मि. मेनझीस यांनींहि प्रशंसोद्गार काढले आहेत. मँचेस्टर गार्डियन, लंडन टाइम्स इ. प्रमुख वृत्तपत्रांनींहि सिडने परिषदेमुळें कार्याचें एक पाऊल पुढें पडलें आहे व पौंडाची खुल्या रीतीनें देवघेव साध्य करण्याचें धोरण कांहीं काळानें तरी गांठतां येईल याबद्दल समाधान व्यक्त केलें आहे.

१९५२ च्या जानेवारी व डिसेंबर अशा महिन्यांत दोन वेळां राष्ट्रकुटुंबांतील अर्थमंत्र्यांच्या लंडन येथें परिषदा, डॉलर-टंचाईच्या प्रश्नाला तोंड देण्याकरितां, भरल्या होत्या. या परिषदांनीं डॉलर देशांकडे निर्गत वाढवावी व डॉलर देशांकडून होणारी आयात २५ टक्क्यांनीं कमी करावी असे निर्णय घेतले. या निर्णयांची अंमलबजावणी झाल्यामुळें जून, १९५३ अखेर पूर्ण झालेल्या एका वर्षांत डॉलर देशांशीं झालेल्या व्यापारांत अनुकूल तफावत उरली व व्यापारांतील ही सुधारणा १९५३ अखेरपर्यंत टिकून राहिली आहे. जून १९५२ अखेर पूर्ण झालेल्या एका वर्षांत डॉलर देशांशीं झालेल्या व्यापारांत प्रतिकूल तफावत आली होती. परंतु स्टर्लिंग गटांतील देशांना, व्यापार सुधारल्यामुळें, मध्यवर्ती सुवर्ण व डॉलर निधीमध्यें चांगली भर घालतां आली आहे. जागतिक व्यापाराच्या दृष्टीनें पौंड किंवा स्टर्लिंग मजबूत करावयाचे तर मध्यवर्ती सुवर्ण व डॉलर निधीमध्यें आणखी भर घालतां आली पाहिजे असा निर्णय सिड्ने परिषदेनें घेतला आहे. हें साध्य करण्यासाठी राष्ट्र–कुटुंबांतील देशांनीं आपलें अंतर्गत उत्पादन वाढवून व त्याच वेळीं मालाच्या किंमती शक्य तितक्या कमी पातळीवर राखण्याचा प्रयत्न करून, परदेशांकडे होणारी निर्गत वाढविण्याचे जोरदार प्रयत्न केले पाहिजेत. पूर्वींच्या लंडन येथील परिषदांतून केवळ डॉलर देशांशीं व्यापार वाढविण्याची दृष्टि ठेवण्यांत आली होती, परंतु आतां राष्ट्रकुटुंबांतील देशांची अंतर्गत परिस्थिति थोडीशी सुधारल्यामुळें जगांतील सर्वच देशांशीं चालणारा निर्गत व्यापार वाढविला पाहिजे असा महत्त्वाचा निर्णय घेण्यांत आला आहे. हें उद्दिष्ट साधण्यासाठी अंतर्गत विकास–योजनांवर भर दिला पाहिजे. परंतु विकास–योजनांचा कार्यक्रम निश्चित करण्यांत आला असला, तरी त्यासाठी पैशाची अडचण कांहीं देशांना भासत आहे. तेव्हां प्रत्येक देशानें अंतर्गत बचतीवर भर दिला पाहिजे, व ब्रिटनकडून मिळूं शकणारी भांडवली मदत वाढली पाहिजे. १९५३ मध्यें ब्रिटननें राष्ट्रकुटुंबांतील देशांत गुंतविण्यासाठी १२ कोटी पौंड खुले केले होते. याशिवाय कॉमनवेल्थ डेव्हलपमेंट फिनॅन्स कॉर्पोरेशन-मार्फत कर्ज मिळण्याची व्यवस्था करण्यांत आली आहे. सिड्ने परिषदेंतील या निर्णयामुळें राष्ट्रकुटुंबांतले देश एकमेकांच्या जास्त जवळ आले आहेत, ही एक सूचक गोष्ट आहे. जागतिक व्यापार खुला करून तो वाढविणें व पौंड मजबूत करणें, आणि पौंडांची सहजासहजीं देवघेव होऊं शकेल असे प्रयत्न करणें, हें राष्ट्रकुटुंबाचें आतां ध्येय बनलें आहे. हें ध्येय मदत करून साधणार नाहीं, तर व्यापार वाढवूनच साधतां येईल, ही दृष्टि आतां निर्माण झाली आहे. तेव्हां व्यापाराच्या बाबतींत असलेलीं नियंत्रणें आतां हळूं हळूं रद्द केलीं पाहिजेत, व संकुचित तत्त्वावर चालणारा राष्ट्रां-राष्ट्रांतील व्यापार आतां उदार धोरणानें व खुल्या रीतीनें चालविला पाहिजे. जागतिक व्यापार सर्वांना खुला झाला पाहिजे, म्हणजेच तो वाढूं शकेल. हें ध्येय साधण्यासाठी प्रत्येक देशानें आपल्या प्रजेची क्रयशक्ति वाढविली पाहिजे, उत्पादन वाढविलें पाहिजे व वस्तूंचे भाव शक्य तितके कमी केले पाहिजेत. अमेरिकेच्या धोरणावर कांहीं गोष्टी अवलंबून आहेत याची परिषदेला जाणीव आहे. म्हणूनच मि. आयसेनहोअर यांनीं अमेरिकन काँग्रेसला अगदी नुकत्याच धाडलेल्या संदेशांत अमेरिका आपली अर्थव्यवस्था मजबूत व वर्धिष्णु राखील असें म्हटलें आहे. त्याबद्दल सिडने परिषदेनें आनंद व्यक्त केला आहे.

सिड्ने परिषदेचे निर्णय हिंदच्या दृष्टीनेंहि महत्त्वाचे व सूचक समजले पाहिजेत. कारण, हिंद हा ब्रिटिश राष्ट्रकुटुंबाचा व स्टर्लिंग गटाचाहि सदस्य आहे. आजच्या जागतिक परिस्थितीच्या हिताच्या दृष्टीनें पौंड मजबूत होणें ही गोष्ट अतिशय महत्त्वाची आहे. पौंड मजबूत झाला तर हिंदचाहि फायदा होणें संभवनीय आहे. यापुढें साम्राज्यान्तर्गत सवलतींच्या तत्त्वावर व्यापार चालविला जाणार नाहीं, तर उत्पादन वाढवून जागतिक व्यापार शक्य तितका वाढविणें हें ब्रिटिश राष्ट्रकुटुंबाचें धोरण राहणार आहे. सिड्ने येथें ठरविण्यांत आलेलें हें धोरण हिंदच्या दृष्टीनेंहि निश्चित फायदेशीर ठरेल.

---

## शास्त्री अवार्डवरील अपील

शास्त्री अवार्डवर करण्यांत आलेलें मुख्य अपील लेबर अपेलेट ट्रायब्युनलच्या स्पेशल बेंचपुढें गेल्या वर्षीच्या सप्टेंबरपासून चालू आहे. "शास्त्री अवार्ड पूर्णपणें बाजूस सारून सर्व प्रश्नांची पुनः वाटाघाट व्हावी" अशी ऑल इंडिया बँक एम्प्लॉईज असोसिएशनची मागणी आहे. शास्त्री अवार्ड एप्रिल १९५३ मध्यें प्रसिद्ध झालें व त्यानें ९३ बँकांतील ५१,५१३ नोकरांवर दररोज ६॥ तास व शनिवारीं ४ तास काम करण्याचें बंधन घातलें. अवार्डनें वेतनश्रेणी सांगितल्या, त्या प्रत्येक बँकेच्या खेळत्या भांडवलावर व व्यवहारक्षेत्रावर अवलंबून ठेवल्या. स्पेशल बेंचचा अपिलाबाबत निवाडा लवकरच प्रसिद्ध होईल.

## वारसा कराची तरतूद: विमा कंपन्यांना नवें क्षेत्र

वारसा कर भरतां यावा, ह्यासाठी आयुर्विम्याचा अवलंब पाश्चात्य देशांत मोठ्या प्रमाणावर केला जातो. कारण, मृत्यूनंतर वारसा कर भरण्यास लागणारी रक्कम विमा पॉलीसीमुळें तात्काळ उपलब्ध होते आणि मालमत्ता विक्रीस निघण्याचा प्रसंग टळतो. भारतांतहि आयुर्विम्यास हें अत्यंत जरूरीचें व महत्त्वाचें कार्य पार पाडतां येईल, आणि त्या दृष्टीनें आयुर्विम्याच्या वाढीस मोठा वाव उपलब्ध होईल.

विमा पॉलिसींना खालीलप्रमाणें वारसा कराची माफी एस्टेट ड्यूटी कायद्याच्या ३२ व्या कलमानें दिलेली आहे:—

(१) द्याव्या लागणाऱ्या वारसा कराइतक्या, परंतु ५० हजार रुपयांपेक्षा अधिक नाहीं इतक्या, रकमेच्या मृताच्या विमा पॉलिसी. ह्या पॉलिसी वारसा कर भरण्यासाठींच काढलेल्या असल्या पाहिजेत किंवा त्यासाठी सरकारला असाइन केलेल्या असल्या पाहिजेत.

(२) मृताच्या, ५ हजार रुपये पर्यंत रकमेच्या विमा पॉलिसी.

(३) मृताच्या स्त्री—नातेवाइकांच्या विवाहासाठी ज्यांची रक्कम राखून ठेवलेली आहे अशा, प्रत्येक नातेवाइकासाठी ५ हजार रुपयांपर्यंतच्या, विमापॉलिसी.

ह्याखेरीज, २,५०० रु. पर्यंतच्या कायद्यास मान्य असलेल्या देणग्यांसाठी व १,५०० रु. च्या इतर देणग्यांसाठी काढलेल्या पॉलिसींनाहि कर माफ राहील.

वारसा करामुळें विमाक्षेत्रांत झालेल्या वाढीचा फायदा घेण्यासाठी विमा कंपन्यांनीं योजना आखण्यास प्रारंभ केला आहे. आणि कांहीं कंपन्यांनीं विमेदाराचें विम्याच्या वेळचें वय ६० वर्षें पर्यंत असलें तरी विमे स्वीकारण्यास सुरुवात केली आहे; मात्र हे विमे वारसा कर देण्यासाठी घेतलेले असले पाहिजेत. अर्थात्‌च, ज्याची मालमत्ता किमान ५०,००० रु. ची आहे, अशांनाच वारसा कराची तरतूद करावी लागणार असल्यानें, मध्यमवर्गीयांच्या विम्यावर अवलंबून असणाऱ्या कंपन्यांना ह्या नव्या क्षेत्राचा फायदा मिळणें कठीण आहे. मोठ्या विम्यांच्या कंपन्यांना मात्र व्यवसायवृद्धीचें मोठेंच साधन प्राप्त झालें आहे.

### वारसा कराचे दर

ता. १५ ऑक्टोबर १९५३ पासून जम्मू व काश्मीर खेरीज भारताच्या इतर सर्व राज्यांत वारसा कराच्या कायद्याचा अंमल सुरू झाला. १९५३–५४ सालासाठी किती किंमतीची मिळकत वारसा करापासून मुक्त आहे, कराचे दर कोणते आहेत व कोणत्या राज्यांतील शेतजमिनींना कर लागू आहे तें खालीं दिलें आहे.

(अ):— मिताक्षर, मरुम्माकट्टायम किंवा अलियासंतान कायदा लागू असलेल्या हिंदु संयुक्त कुटुंबाच्या मिळकतींतील हितसंबंधास खालील दर लागू आहेत:—

| | मिळकतीची किंमत | | कराचा दर |
|---|---|---|---|
| (१) | १ ल्या | ५० हजार रुपयांवर | कर नाहीं |
| (२) | त्यानंतरच्या | ५० हजार रुपयांवर | शेंकडा ५ |
| (३) | " | ५० हजार " | " ७॥ |
| (४) | " | ५० हजार " | " १० |
| (५) | " | १ लाख " | " १२॥ |
| (६) | " | २ " " | " १५ |
| (७) | " | ५ " " | " २० |
| (८) | " | १० " " | " २५ |
| (९) | " | १० " " | " ३० |
| (१०) | " | २० " " | " ३५ |
| (११) | त्यानंतर | | " ४० |

(ब):—वर (अ) मध्यें वर्णन केलेल्या इस्टेटींव्यतिरिक्त इतर इस्टेटीसाठी खालील दर मुक्रर करण्यांत आले आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| (१) | १ ल्या | १ लाख रुपयांवर | कर नाहीं |
| (२) | त्यानंतरच्या | ५० हजार " | शेंकडा ७॥ |
| (३) | " | ५० हजार " | " १० |
| (४) | " | १ लाख " | " १२॥ |
| (५) | " | २ " " | " १५ |
| (६) | " | ५ " " | " २० |
| (७) | " | १० " " | " २५ |
| (८) | " | १० " " | " ३० |
| (९) | " | २० " " | " ३५ |
| (१०) | त्यानंतर | | " ४० |

शेंकडा ४० हा कमालीचा दर ठेवला असून ५० लाखांच्या वरील इस्टेटींवर तो आकारला जाईल.

### वारसा कर व शेतजमीन

वारसा कर सर्व राज्यांतील शेतजमिनींना लागू नसून फक्त खालील राज्यांतील शेतजमिनींनाच लागू आहे.

(१) मुंबई (२) मध्यप्रदेश (३) मध्यभारत (४) राजस्तान (५) ओरिसा (६) पंजाब (७) हैद्राबाद (८) उत्तरप्रदेश (९) सौराष्ट्र (१०) सर्व 'क' वर्गीय राज्यें.

---

### नवा पोलादाचा कारखाना कोठें निघणार?

भारतीय सरकार काढणार असलेला नवा पोलादाचा कारखाना प. बंगालमधील दुर्गापूर अगर ओरिसामधील राऊरकेला येथें निघण्याचा संभव आहे. भारतीय सरकारच्या उत्पादन-खात्याचे चिटणीस श्री. चंदा ह्यांच्याशीं जर्मनीमधील क्रुप्स—डिमॅग कारखान्याचे तज्ज्ञ सध्यां निकाली वाटाघाटी करीत आहेत असें समजतें. प. बंगाल आणि ओरिसा ह्या दोन्ही राज्यसरकारांतर्फे आपआपल्या हक्कांचें समर्थन करण्यांत येत आहे. तथापि अखेरचा निर्णय गुणावगुणावर अवलंबून असावा ह्याबद्दल दोन्ही सरकारांचें एकमत आहे. जमशेटपूर येथें सध्यां जें बिडाचें लोखंड तयार होतें त्याची किंमत जगांत सगळ्यांत स्वस्त आहे असें म्हणतात. प. बंगाल सरकारचें म्हणणें असें आहे कीं, दुर्गापूर येथें नवा पोलादाचा कारखाना काढण्यांत आल्यास उत्पादनाची किंमत जमशेटपूर येथील कारखान्यांत तयार होणाऱ्या लोखंडाइतकी कमी पडेल. दुर्गापूर येथें जुनें लोखंड भरपूर प्रमाणांत मिळतें. त्याचप्रमाणें वीज व पाणीहि मिळूं शकतें. कोळसा जवळच सांपडण्याची शक्यता असून रेल्वे आणि रस्ते ह्या दोन्ही मार्गांनीं वहातुकीची व्यवस्थाहि चांगली होऊं शकेल. राऊरकेला येथें कारखाना न काढतां तो जर दुर्गापूर येथें काढण्यांत आला तर ते १० कोटी रुपयांची बचत होऊं शकेल असें सांगण्यांत येत आहे. ओरिसा सरकारनें आपली बाजू मांडतांना ह्याच मुद्यावर जोर दिला आहे. कच्च्या मालाचा सुलभ पुरवठा व आवश्यक त्या खनिजांची उपलब्धता ह्या गोष्टी राऊरकेला येथेंहि अनकूल आहेत. पाण्याचा पुरवठा ब्राह्मणी नदीपासून होऊं शकेल आणि विजेचा पुरवठा हिराकूदच्या धरणापासून होईल. संकल्पित कारखान्यांत १० लाख टन पोलाद तयार करण्याचें ठरलें तरीसुद्धां इतक्या उत्पादनास लागणारी जुळवाजुळव शक्य आहे, असें ओरिसा सरकारचें म्हणणें आहे.

## भारतामधील सायकलींचा धंदा

ब्रिटिश सायकल मॅन्युफॅक्चरिंग युनिअनचे डायरेक्टर मि. एच्. एम्. पालिन हे नुकतेच भारतांत येऊन गेले. टॅरीफ कमिशनच्या सायकलींच्या धंद्याविषयीं ज्या बैठकी झाल्या त्यांना हजर रहाण्याकरितां ते आले होते. त्यांनीं असा अंदाज केला आहे कीं, पुढील पांच वर्षांत भारताला दरवर्षी १०,००,००० सायकलींची जरूरी लागेल. तथापि ह्या बाबतींत मतभेद दिसून येतो. भारतीय कारखानदारांच्या मतें दरवर्षी ३,००,००० सायकलींचीच मागणी येईल. आयात-व्यापाऱ्यांच्या मतानें सुमारें ६,००,००० सायकलींना मागणी येईल. भारतामधील रस्त्यांची वाढ आणि रहाणीच्या मानांत अपरिहार्यपणें होत जाणारी सुधारणा ह्यांच्या आधारानें मि. पालिन ह्यांनीं आपला अंदाज केला आहे.

मि. पालिन आणखी असें म्हणतात कीं, भारतांत ब्रिटिश आणि देशी सायकलींना पुरेशी बाजारपेठ आहे. भारतामधील सायकलींचा धंदा उभारण्यास ब्रिटिश कारखानदार तयार आहेत आणि त्याप्रमाणें त्यांनीं दोन भारतीय कारखानदारांशीं सहकार्यहि केलें आहे. ब्रिटिश कारखानदार भारतीय कारखानदारांचा धंदा कमी करण्याचे प्रयत्न करीत आहेत ही गोष्ट खरी नाहीं. अजून बरींच वर्षें ब्रिटिश आणि भारतीय कारखानदारांचे प्रयत्न एकमेकांना पूरकच होतील. ब्रिटनमधील सायकलींचे कारखाने सुद्धां अजून संपूर्णपणें स्वयंपूर्ण नाहींत. सायकलींना लागणारे सर्वच भाग प्रत्येक कारखाना स्वतःच करीत नाहीं. पुष्कळसे कारखाने कांहीं विशिष्ट भागच तयार करतात आणि ते स्वतःच तयार करणें ब्रिटनमधील मोठ्या कारखान्यांना सुद्धां आर्थिक दृष्ट्या परवडणार नाहीं. भारतीय सायकल-कारखानदार टॅरिफ कमिशनला असा आग्रह करीत आहेत कीं, आयात होणाऱ्या सायकलींवरील ६० टक्के संरक्षक जकात चालू ठेवण्यांत यावी. भारतीय बनावटीच्या सायकलीविरुद्ध देशांतील लोकांची दृष्टि पूर्वग्रहदूषित असल्यामुळें अशा जकातीची आवश्यकता आहे, असें त्यांचें म्हणणें आहे. उलटपक्षीं, सायकली आयात करणाऱ्या व्यापाऱ्यांचें मत असें आहे कीं, २४ टक्के संरक्षक जकात भारतीय कारखानदारांच्या हितसंबंधांचें रक्षण करण्यास पुरेशी होईल. टॅरिफ कमिशनला सर्व बाबींचा विचार करून स्वतःच्या शिफारसी कराव्या लागतील आणि भारतीय सरकार जें धोरण ठरवील त्याचा स्वीकार ब्रिटिश आणि हिंदी कारखानदारांना करावा लागेल.

तथापि, ह्या बाबतींत ब्रिटिश कारखानदारांना स्वतःचीं कांहींच मतें नाहींत, असें मात्र नाहीं. त्यांच्या मतानें भारतामधील सायकलींचा धंदा आतां अशा अवस्थेला आला आहे कीं, त्याला संरक्षक जकातीची जरूरी राहिलेली नाहीं. ह्या विषयासंबंधीं अमेरिकेचें उदाहरण त्यांनीं दाखविलें आहे. युद्धापूर्वीं ब्रिटन अमेरिकेला फारशा सायकली निर्यात करीत नसे. पण ब्रिटिश सायकलींची आयात जेव्हां दरवर्षी २०,००० पर्यंत होऊं लागली त्यावेळीं अमेरिकन कारखानदारांनीं त्यांच्या टॅरिफ बोर्डाकडे संरक्षक जकातीची मागणी केली. ही मागणी अमान्य करण्यांत आली. तथापि अजूनहि ब्रिटन दरवर्षी ४,००,००० सायकली अमेरिकेला निर्यात करीत आहे. ब्रिटिश सायकलींची स्पर्धा अमेरिकन कारखानदारांना होऊं लागली ही गोष्ट खरी. पण त्याचबरोबर हेंहि खरें कीं अमेरिकन कारखानदारांनीं आतांपर्यंत ज्या बाजारपेठांकडे दुर्लक्ष केलें होतें त्या त्यांना नव्यानें उपलब्ध झाल्या आहेत.


सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.
सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव मुंबई,
शेअर भांडवल व रिझर्व रु. ११,७०,१००
ठेवी .... .... .... रु. १,१९,११,७००
एकूण खेळतें भांडवल रु. १,३३,९४,५००
शाखाः- बँकेचे सर्व व्यवहार केले जातात शाखाः-
दादर बेळगांव
माहीम पुणें

स्थापना १९१८


### अमेरिकेंतील शेतीच्या जादा उत्पादनाचा विनियोग

अमेरिकेंत शेतीचा सुमारें १०० कोटी डॉलर्स किंमतीचा माल पडून असल्यामुळें अमेरिकन सरकार त्याची विल्हेवाट लावण्याचा विचार करीत आहे. पण तसें करण्यापूर्वीं सरकारला काँग्रेसची अनुमति मिळविणें जरूर आहे. भारताला गहूं आणि खत ज्या सोप्या अटीवर अमेरिकेनें दिलें त्यासारख्याच अटीवर ह्या शिलकी मालाची देणगी अमेरिका मागासलेल्या देशांना देणार आहे असें समजतें. अमेरिकेनें हा माल दिला तर तो आपआपल्या देशांत विकून जो पैसा उभा राहील, त्याचा विनियोग त्या-त्या देशाच्या आर्थिक विकासासाठीं करावयाचें बंधन घालण्यांत येईल. तथापि, अमेरिकेंत सांठून राहिलेल्या शेतीच्या मालाला तात्पुरतें गिऱ्हाईक देणें एवढाच ह्या संकल्पित व्यवहाराचा हेतु नाहीं. अविकसित देशांचा विकास झाला तर अमेरिकेच्या शेतीच्या मालाला भविष्य कालांत बाजारपेठ लाभेल असाहि अंदाज करण्यांत येत आहे. अविकसित देशांना अमेरिका जो शेतीचा माल पुरविणार आहे, त्यांत कापसाचा अंतर्भाव करण्यांत आलेला आहे किंवा नाहीं तें अद्याप स्पष्ट झालेलें नाहीं. चालू हंगामांत कापूस पिकविणाऱ्या सर्वच देशांतून जरूरीपेक्षा अधिक कापूस पिकला असल्यानें त्याच्या किंमती उतरल्या आहेत. त्यामुळें पुढील वर्षीं जगांत कापसाची लागवड कमी होण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितींत भारताला अमेरिकेकडून कांहीं कापूस मिळाल्यास तो घेणें इष्ट ठरेल. भारतांत सध्यां कापसाची टंचाई भासत आहे. अमेरिकेंतून कापूस आयात करावयाचा तर त्यासाठीं डॉलर्स द्यावे लागतील, ह्याहि दृष्टीनें अमेरिकेंत पडून असलेल्या कापसापैकीं कांहीं भाग भारताला मिळाला तर तें सोयीचें ठरेल, अशी व्यापारी लोकांची भावना आहे. पुढील वर्षीं जगांत कापसाचें उत्पादन कमी झाल्यास ह्या कापसाचा भारताला उपयोग होईल.

### श्री. पु. पां. गोखले ह्यांस थैली समर्पण

कराड अर्बन को. बँक लि. चे चेअरमन, श्री. पु. पां. गोखले, ह्यांना दि. २३ जानेवारी रोजीं श्री. आण्णासाहेब कर्वे ह्यांच्या हस्तें समारंभपूर्वक एक थैली अर्पण करण्यांत आली. १०,००० रु. ची थैली जमली, त्यापैकीं ८,६५१ रुपयांचा चेक श्री. गोखले ह्यांना श्री. आण्णासाहेब ह्यांच्या हस्तें देण्यांत आला. एका गृहस्थानें आपल्या १,००० रु. च्या ठेवीचें व्याज श्री. गोखले ह्यांना हयातभर दिलें. र. शि. संस्थेतर्फे श्री. गोखले ह्यांना दरमहा ५० रु. देण्याची योजना श्री. भाऊराव पाटील ह्यांनीं जाहीर केली.

### ब्रिटिश विमा कंपन्यांचा भारतांत वाढता व्यवहार

भारतांतील परदेशी विमा कंपन्यांचा व्यवहार वाढत आहे! एकूण विमा व्यवहारांतील हिंदी कंपन्यांच्या व्यवहाराचें प्रमाण घटत आहे! ब्रिटिश कंपन्या जास्त बोनस आणि कमी हप्ते अशा दोन्ही मार्गांनीं हिंदी कंपन्यांशीं स्पर्धा करीत आहेत.

## औद्योगिक बेकारीनिवारणाचे दीर्घकालीन उपाय

(श्री. श्री. वा. काळे, संपादक "अर्थ", ह्यांचा चित्रमयजगत् औद्योगिक विकास विशेषांक, जानेवारी १९५४, मधील लेख.)

### (३)

### अनेक पिढ्यांच्या त्यागाची आवश्यकता

भारतांतील बेकारीविषयक पहाणी प्लॅनिंग कमिशनच्या द्वारां चालू आहे. (अ) २३ गांवांतील बेकारीचें स्वरूप तपासलें जात आहे, (ब) दिल्ली येथील उद्योगविनिमय केंद्रांत नोंदलेल्या बेकारांस मिळणाऱ्या रोजगाराची चौकशी चालू आहे; (क) त्रावणकोर-कोचीनमधील बेकारीच्या चौकशीचें काम चालू आहे आणि (ड) कलकत्ता येथील बेकारीची पहाणी सुरू आहे. नॅशनल सॅंपल सर्व्हेमार्फत ९६० खेडीं, ५३ शहरें व कलकत्ता, मुंबई, मद्रास आणि दिल्ली हीं मोठीं शहरें ह्यांतील बेकारीची तपासणी करण्यांत येत आहे. बेकारीचें स्वरूप लक्षांत येण्यासाठी ह्या पहाण्यांचा उपयोग होईल, हें उघड आहे. परंतु खरा प्रश्न आहे तो नवे उद्योग निर्माण कसे होतील ह्यासंबंधाचा आहे. बेकारी वाढूं नये म्हणून कामगारांना कायम ठेवलें तर कांहीं काल त्यांना वेतन मिळत राहील, हें खरें आहे. पण तें वेतन देण्याइतका नफा उद्योगधंद्यांना होईल काय, ह्याचाहि विचार व्हावयास पाहिजे. ज्यांच्या कामाची खरोखर जरूरी आहे, अशांच्या मेहनतीनें निर्माण होणाऱ्या संपत्तींतून बसून खाणाऱ्यांना किती दिवस पोसतां येईल हा चिंतनीय प्रश्न आहे. नातेवाईकांची नोकरी सुटल्यावर त्यांना कांहीं दिवस मिळवता कुटुंबप्रमुख खाऊंपिऊं घालूं शकला, तरी त्यामुळें नातेवाईक स्वावलंबी होऊं शकणार नाहींत. त्यांना काम मिळावयाचें म्हणजे उद्योगधंदे चालले पाहिजेत आणि वाढले पाहिजेत. म्हणजेच यंत्रसामुग्री व इतर आवश्यक खर्चासाठीं मोठाल्या रकमा उपलब्ध झाल्या पाहिजेत. परकीय मदत, सरकारी कर्जउभारणी किंवा खाजगी बचत ह्यांच्या मार्गेंच ही गुंतवणूक शक्य होईल आणि ज्याप्रमाणें प्रत्येक व्यक्तीनें स्वतःच्या उत्पादनांतून चरितार्थ चालविला पाहिजे, तद्वत् प्रत्येक देशानेंहि आपल्या उत्पादनांतूनच भांडवलनिर्मिति केली पाहिजे.

कम्युनिस्ट राजवटींत बेकारीचा प्रश्नच उपस्थित होत नाहीं, हें सत्य मानलें तरी जोंपर्यंत आपली अर्थव्यवस्था कम्युनिस्ट तत्त्वावर आधारलेली नाहीं, तोंपर्यंत आपले उपायहि कम्युनिस्ट पद्धतीचे असणार नाहींत हें उघड आहे. तेव्हां एका अर्थव्यवस्थेखालीं नांदत असतांना प्रतिस्पर्धी अर्थव्यवस्थेचे उपाय जसेच्या तसे अंमलांत आणतां येणें अशक्य आहे; त्यानें दोन्ही पद्धतींमधील तोटे मात्र पदरांत यावयाचे! एवढें मात्र खरें कीं, उद्योग वाढविण्याचा खरा मार्ग उद्योग निर्माण करणें व उत्पादन-साधनें वाढविणें हा आहे आणि त्यासाठी भांडवलाची आवश्यकता आहे; हें भांडवल जनतेच्या त्यागांतूनच अखेर निर्माण व्हावें लागेल. पंचवार्षिक योजनेंतील सरकारी खर्चाच्या योजना असोत वा खासगी भांडवलदारांनीं पार पाडावयाच्या योजना असोत, सामान्य नागरिकालाच त्यांचा बोजा उचलावा लागणार आहे. वाढती लोकसंख्या लक्षांत घेतली, म्हणजे बेकारीचा प्रश्न कांहीं वर्षांत सुटणारा नसून, तो अनेक पिढ्यांना पुरून उरणारा आहे, हें लक्षांत येईल. म्हणूनच अशा कठीण अवस्थेस तोंड देण्यासाठी नागरिकांची एकजूट व्हावयास हवी; त्यासाठी अनुकूल वातावरण व प्रेरक स्फूर्ति ह्यांची अत्यंत मोठी गरज आहे. आजच्यापुरता विचार करून बाजूस सरणाऱ्या पुढाऱ्यांच्या आंवाक्याबाहेरचा हा प्रश्न आहे; दूरदृष्टीनें विचार करून योग्य त्या उपायांची कडक अंमलबजावणी करूं शकणारे राज्यकर्तेच कांहीं लोकांत व कांहीं काळ अप्रिय झाले तरी अखेर लोकहित साधतील हें उघड आहे. म्हणून लोकांनीं सरकारचे हात मजबूत करून व त्याच्या मार्गांतील अडचणी दूर करून-निदान त्यांत भर न घालून-आपल्या मागून येणाऱ्या पिढ्यांसाठीं पुण्यकार्य करीत रहाणें देशाच्या हिताचें आहे. (समाप्त)

---

### पुरोहित ढालीचे सामने

पुण्यांतील बँका-बँकांमधील पुरोहित ढालीसाठीं सामने नुकतेच संपून, सेंट्रल बँकेनें इंपीरिअल बँकेवर विजय मिळवून ढाल जिंकली. उत्कृष्ट फलंदाजीचें बक्षीस श्री. नाईक व उत्कृष्ट गोलंदाजीचें बक्षीस श्री. उकिडवे ह्यांना मिळालें. विजेता संघ (सें. बँक) विरुद्ध इतर सर्व बँकांचा संयुक्त संघ, असा मित्रत्वाचा सामना पूना क्लबच्या हिरवळीवर खेळण्यांत आला, व त्यानंतर श्री. एन. डी. नगरवाला ह्यांच्या हस्तें बक्षीस समारंभ झाला. गेल्या वर्षीं महाराष्ट्र बँकेनें पुरोहित ढाल जिंकली होती.

---

**लेनिनचा सर्वांत उंच पुतळा**—सोव्हिएट रशिआचा संस्थापक निकोलाय लेनिन ह्याचा सर्वांत उंच पुतळा कॅस्पिअन समुद्रकिनाऱ्यावरील बाकू शहरांत उभारण्यांत येणार आहे. पुतळ्याची उंची ३५ फूट असून तो ५० फूट उंचीच्या एका दगडी स्तंभावर स्थापन करण्यांत येईल. पुतळा ब्रॉन्झचा बनविला जाईल.

**पोस्टाच्या बँकांतील शिल्लक**—१९५२-५३ सालीं पोस्टाच्या सेव्हिंग्ज बँकांमधून १२०·५४ कोटी रुपयांच्या ठेवी ठेवण्यांत आल्या होत्या. १९५१-५२ सालीं हीच रकम ११७·७६ कोटी रुपयांची होती.

---


# WANTED

Applications for some posts of Clerks in the grade of 40-5-90 plus Dearness Allowance, are invited so as to reach the undersigned on or before 15th February 1954.

Only such persons as have passed the Diploma Examinations of the Maharashtra Regional Co-op. School, Poona; Co-op. Training College, Poona; Inter Commerce Examination of recognised University or Degree Examinations in Commerce or Arts of a recognised University need apply. Persons with previous practical experience in Co-op. Banking will be given preference.

The applicants should not be less than 18 or more than 35 years of age.

Selected candidates will be liable to be posted to any of the Branch Offices in the Poona District.

Poona 2, Date: 30-1-54.
Poona Central Co-op. Bank, Ltd.,
Post Box No. 511, Poona 2.

**M. V. Rabade**
Managing Director.

## इन्कमटॅक्सचा नवा जाच

( व. वि. लोणकर, एम्. ए., बी. कॉम. )

चालू वर्षापासून नव्या सरकारी हुकमाप्रमाणें स्पेक्युलेशनमध्यें झालेली नुकसान इतर उत्पन्नांमधून वळती घालण्याचे व मग राहिलेल्या उत्पन्नावर कर आकारण्याची पद्धत बंद करण्यांत आली आहे. यामुळें कर भरणाऱ्यावर नवाच जुलूम सुरू झाला आहे. समजा, एकाद्या वकिलाचें वकिलीचें उत्पन्न दहा हजार रुपये आहे. दुसरीकडे त्यानें शेअर्समध्यें कांहीं व्यवहार केले व त्यांत त्याला पांच हजारांची नुकसान आली तरी आतां त्याला नुकसान वळती करून राहिलेल्या निव्वळ पांच हजारांवर कर भरावयास न लागतां संपूर्ण दहा हजारांवरच कर द्यावा लागेल. शेअर्सची पांच हजारांची नुकसान जर त्याला पुढल्या वर्षी शेअर्सच्याच व्यवहारांत नफा झाला तर त्यांतूनच फक्त वळती करतां येईल आणि समजा जर सारखी नुकसानच येत राहिली तरी त्याला मूळ वकिलीच्या पूर्ण उत्पन्नावरचा भर कर द्यावा लागणारच; मग एकूण नुकसान तितक्या वर्षींच्या एकूण उत्पन्नापेक्षा जास्त झाली तरी कर भरणें चुकणार नाहीं. आणखी असें कीं, चालू वर्षातच एकादे वेळेस एकूण उत्पन्नापेक्षा नुकसान जास्त होऊन हातांत कपर्दिक जरी शिल्लक राहिली नाहीं तरी वकिलीच्या उत्पन्नावरचा कर भरण्याची सक्ति राहणारच आणि जर कर भरणें अशक्य झालें तर मालमत्तेचा नेहमींप्रमाणें लिलांव पुकारण्यास सरकार तयार आहेच.

सरकारनें असा हुकूम काढण्याचें कारण असें सांगण्यांत येतें कीं, कांहीं मोठे लोक दुसऱ्याची नुकसान 'विकत' घेऊन स्वतःचा कर चुकवतात अथवा कमी दरांत कर भागवितात. पण या म्हणण्यांत अर्थ नाहीं. ज्यांनीं असें केलें असेल त्यांचे हिशेब व धंदे तपासून पाहण्यास व कुलंगडी बाहेर काढण्यास सरकार समर्थ नाहीं, असा त्याचा अर्थ होतो व संन्याशांच्या समूहांत चोर लपला म्हणून सगळ्याच संन्याशांना फांशी देण्याचा अंधेरनगरींतला कारभार होतो. याच्याहिपुढें जाऊन इन्कमटॅक्स खातें सांगतें कीं, या नव्या हुकमानें तुम्हांला जांच होत असेल तर तुम्ही स्पेक्युलेशन करूं नका. ही उपदेशकाची भूमिका इन्कमटॅक्स खात्याला घेण्याचें कारण नाहीं. कारण, स्पेक्युलेशनमधून उत्पन्न होणाऱ्या स्टँपचें उत्पन्न इकडे सरकार डोळ्यांत तेल घालून वसूल करत असतें.

आमचे अर्थमंत्री आपल्या हुकुमाचा फेर विचार करून, मुकाट्यानें जांच सोसणाऱ्या अनेक कर-भरणाऱ्यांना मुक्त करतील काय? कायदेमंडळ याकरतां हलवणें अथवा सुप्रीम कोर्टांत जाणें साध्या माणसाच्या शक्तीबाहेरचें आहे.

### श्रॉफ व सावकार ह्यांची महत्त्वपूर्ण कामगिरी

बंगलोर येथील शिकारपुरी श्रॉफस असोसिएशननें "रिझर्व्ह बँक कमिटी ऑन फायनान्स टु दि प्रायव्हेट सेक्टर ऑफ इंडस्ट्री"चे चेअरमन, श्री. ए. डी. श्रॉफ व इतर सदस्य ह्यांचा सत्कार केला. त्यावेळीं भाषण करतांना श्री. श्रॉफ हे म्हणाले, "लहान प्रमाणावर व्यापार आणि कारखानदारी करणारांना बँका मदत करूं शकत नाहींत. परंतु, श्रॉफ व सावकार सुप्रतिष्ठित बँका जी जोखीम पत्करण्यास तयार होणार नाहींत ती पत्करून भांडवल पुरविण्याचें मोठें व महत्त्वाचें कार्य करीत आहेत. बँकिंग क्षेत्रांतील उणीव भरून काढून ते लहान व्यापारी व कारखानदार ह्यांना अभिनंदनीय साहाय्य करीत आहेत."

### फॅमिली बजेट बुक

पलाई सेंट्रल बँक लि. नें एक "फॅमिली बजेट बुक" प्रसिद्ध केलें आहे.

### "दि ईस्टर्न को-ऑपरेटर"

सहकारी विषयास वाहिलेल्या ह्या इंग्रजी साप्ताहिकाचें आम्हीं स्वागत करतों. सहकारी संघटनेस आतां मध्यवर्ती सरकारी धोरणाचा पाठिंबा मिळालेला असून राष्ट्रीय उद्धाराचें व सामाजिक न्यायाचें एक माध्यम ह्या दृष्टीनें सहकारी चळवळीस महत्त्व प्राप्त झालें आहे. आर्थिक नियोजनांत सहकारी संघटनेस वैशिष्ट्यपूर्ण स्थान आहे. सहकारी संस्था, त्यांचे सभासद व त्यांची उलाढाल ह्यांत वाढ होत गेली आहे, परंतु सहकारी चळवळीचीं मूलतत्त्वें, त्या तत्त्वांचा परिस्थितीशीं योग्य मेळ, इत्यादि बाबतींत लोकांना ज्ञान देणारीं पुस्तकें व नियतकालिकें अद्याप फारशीं आढळत नाहींत. "दि ईस्टर्न को-ऑपरेटर" ह्या दृष्टीनें उपयुक्त कामगिरी करील अशी अपेक्षा आहे. सहकारी बातम्याबरोबर सहकारी विषयांची उच्च भूमिकेवरून तुलनात्मक चर्चा होत राहणें सहकारी चळवळीच्या जिवंतपणासाठीं अगत्याचें आहे, आणि त्यासाठीं सहकाराचा अभ्यास करणाऱ्या तज्ज्ञांचीहि आवश्यकता आहे. "दि ईस्टर्न को-ऑपरेटर"चा पहिला अंक २६ जानेवारी १९५४ रोजीं, प्रजासत्ताक दिनीं, प्रसिद्ध झाला आहे. त्यास आलेल्या संदेशांवरून अशा साप्ताहिकाची जरूरी सिद्ध झाली आहे. (कार्यकारी संपादक : सौ. ज्वालाराणी भारतीय, अंधेरी, मुंबई)

### बँक ऑफ इंग्लंडचे गव्हर्नर मुंबईस येणार

बँक ऑफ इंग्लंडचे गव्हर्नर, मि. सी. एफ. कॉबॉल्ड, हे रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नरांच्या निमंत्रणावरून मुंबई येथें ५ फेब्रुवारी रोजीं येणार आहेत. ९ फेब्रुवारी रोजीं ते दिल्ली येथें जातील व अर्थमंत्री आणि सौ. दुर्गाबाई देशमुख ह्यांचे पाहुणे म्हणून रहातील. कलकत्ता येथें तीन दिवस मुक्काम करून ते कोलंबोला जातील. श्री. कॉबॉल्ड ह्यांच्याबरोबर त्यांच्या पत्नीहि आहेत.

## नोटीस

### दि बँक ऑफ महाराष्ट्र, लिमिटेड.

नोटीस देण्यांत येते कीं, बँकेच्या भागीदारांची एकोणिसावी साधारण सभा रविवार, दि. २८ फेब्रुवारी १९५४ ला सायंकाळीं ४ वाजतां (स्टँ. टा.) बँकेचें रजिस्टर्ड ऑफिस ८९८ सदाशिव पेठ, पुणें शहर या ठिकाणीं खालील कामासाठीं भरेल.

(१) बँकेचा दि. ३१ डिसेंबर १९५३ अखेरचा ताळेबंद, नफातोटा-पत्रक, आणि संचालक मंडळाचा व ऑडिटरांचा रिपोर्ट यांचा विचार करणें.

(२) डिव्हिडंड मंजूर करणें.

(३) निवृत्त होणाऱ्या (फेरनिवडणुकीस पात्र असलेल्या) चार संचालकांचे जागीं संचालकांची निवडणूक करणें.

(४) ऑडिटर्स नेमणें व त्यांचा मुशाहिरा ठरविणें.

(५) अध्यक्षांचे परवानगीनें पुढें येणारीं इतर कामें.

बोर्डाचे हुकुमावरून

पुणें शहर } चिं. वि. जोग

दि. २४-१-१९५४ }* मॅनेजर.

वि. सू.—बँकेचीं शेअर ट्रॅन्सफर बुकें दि. २३ फेब्रुवारी १९५४ ते ४ मार्च १९५४ (दोन्हीं दिवस धरून) बंद राहतील.

*डिव्हिडंड मंजूर झाल्यानंतर तें शनिवार दि. २७ मार्च १९५४ पासून दिलें जाईल. डिव्हिडंड वॉरंटस भागीदारांच्या नोंदलेल्या पत्त्यांवर टपालानें पाठविलीं जातील. पत्ता बदलला असल्यास बँकेकडे सत्वर कळवावें.

# पुणें जिल्हा सहकारी खरेदी-विक्री संघ लि.

११५।११६ भवानी पेठ, गूळ आळी, पुणें २.

तारेचा पत्ताः—सॅनको सोप. टेलिफोन नं. ३११५

( जिल्ह्यांतील शेतकरी व नागरी जनतेस दैनंदिन गरजेच्या वस्तु पुरविणें व शेतकऱ्यांचा माल किफायतशीर विकून देणें, या उद्देशानें स्थापन झालेली जिल्ह्यांतील मध्यवर्ती संस्था )

संस्थेकडे खालीलसाठी लिहा अगर समक्ष भेटा.

★शेतीचीं सर्व प्रकारचीं अवजारें; ऊंस गाळण्याचे चरक; सल्फेट व इतर खतें; पिकांच्या रोगांवरील औषधें, पेंड.

★शेतकी खात्यामार्फत जिल्ह्यांत होणारें पेंड, खतें व मिक्श्चर यांचें वाटप या संस्थेमार्फतच करण्यांत येतें.

★पुणें जिल्हा ग्रामसुधारणा मंडळाच्या विद्यमानें चालू असलेल्या नियंत्रित लोखंड, सिमेंट वाटप योजनेंतील—गाड्यांचे आंस, धांवपट्ट्या, नळीचे पत्रे, प्लेन पत्रे, वगैरे व सिमेंट.

★ग्राहक सहकारी संस्थांना लागणारा माल संघाच्या अडत दुकानामार्फत पुरविला जातो.

★शेतकऱ्यांचा शेतीचा माल संस्थेच्या अडत दुकानामार्फत पुणें येथील बाजारपेठेंत किफायतशीर रीतीनें विकून दिला जातो.

★जिल्ह्याबाहेरील शेतकरी व सहकारी संस्था यांचा माल पुणें बाजारपेठेंत किफायतशीर रीतीनें विकून दिला जाईल.



# भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

मुख्य कचेरीः—भोर, जि. पुणें.

शाखाः—पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ७१,६०० |

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.

रावसाहेब य. द. खोले. श्री. चं. रा. राठी.

श्री. के. वि. केळकर, एम्. ए., एलएल्. बी. श्री. बा. ग. धंदुके.

सरकारी रोखे खरेदी–विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरीः—बुधवार घ. नं. ३६१–६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठी लिहा.

वाय. एस. जोशी, अ. मॅनेजर. एन. व्ही. पांडव, मॅनेजर



# पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.

—पुणें शहर—

लक्ष्मी रोड

पोस्ट बॉक्स नं. ५११ ] [ टेलिफोन नं. २४८३

भोर, पौड व वडगांव ( मावळ ) येथें बँकेनें आपल्या नवीन शाखा-कचेऱ्या उघडल्या आहेत. येथें व इतर शाखांतहि सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार व सहकारी सोसायट्यांना शेतीसाठी कर्जे देणें, सोनें-चांदीचे तारणावर कर्जे देणें, वगैरे व्यवहार सुरू केले आहेत.

चालू, सेव्हिंग्ज ठेवी स्वीकारल्या जातात.

अेक ते दहा वर्षे मुदतीच्या ठेवीहि स्वीकारल्या जातात.

१ वर्ष २ टक्के, २ वर्षें २॥ टक्के, ५ वर्षे ३ टक्के, ७ वर्षे ३॥ टक्के, १० वर्षे ४ टक्के. याशिवाय रुपये २५,००० अगर पुढील रकमा ३ ते ९ महिने मुदतीनें घेण्यांत येतात.

दराबद्दल समक्ष चौकशी करावी.

वरीलप्रमाणें सर्व व्यवहार पुणें येथें मुख्य कचेरींत व इतर शाखांमध्यें होत असून त्याखेरिज पुणें येथें सेफ डिपॉझिट व्हॉल्टस् व सेफ कस्टडीची सोय आहे. त्याचा फायदा खातेदारांनीं घ्यावा.

जास्त माहितीसाठी लिहा अगर समक्ष भेटा.

मो. वि. खडे,
मॅनेजिंग डायरेक्टर.



# दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर ( बेलापूर रोड ), ओझर ( जि. नाशिक ) खोपोली ( जि. कुलाबा )

श्री. बी. बी. वाळवेकर ( अध्यक्ष ) ||| श्री. के. पी. जोशी ( उपाध्यक्ष )

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ४,००,००० |

एकूण खेळतें भांडवल ६० लाखांचे वर

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. बा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
} मॅनेजिंग डायरेक्टर.


हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ), पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.